# बृहन्मुंबई महानगरपालिका

घ.क.व्य. जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, प्रभादेवी, मुंबई - 400 013.

क्र. सहा.अभि.(घ.क.व्य.)जी.द./14366/ दिनांक :-07/02/2024

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)

## अशासकीय संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

सदर सूचनेव्दारे जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना कळविण्यात येत आहे की, **जी/दक्षिण विभागात नागरी वस्त्यांमधील सार्वजनिक शौचालयांमध्ये दैनंदिन साफसफाई/स्वच्छता राखण्याकरीता** मागणीनुसार कामगार पुरविण्यासाठी खालील अटी व शर्तींनुसार विभागातील ईच्छुक स्थानिक नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनी सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई -400 013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत दि.10/02/2024 रोजी दु.01.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखे नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. विषयांकीत स्वरुपाच्या कामाकरीता पात्र संस्थांमधून सोडत काढून आवश्यक 05 संस्थांची निवड करण्यात येईल तसेच अतिरिक्त 02 संस्थांची प्रतिक्षा यादीकरीता निवड करण्यात येईल.
3. आठ तासांच्या दुपार पाळीमध्ये आवश्यकते व सूचनेनुसार जी/दक्षिण विभागात कामगारांचा पुरवठा करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.
4. संस्थांनी नेमून दिलेल्या ठिकाणी आवश्यक कामगारांचा पुरवठा करुन संबंधित कनिष्ठ अवेक्षक यांना दैनंदिन कामाचा अहवाल छायाचित्रासहीत (timestamp app व्दारे) देणे बंधनकारक राहील.
5. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.743.84 प्रतिदिन / प्रति कामगार (लेव्ही वगळून) या दराने राहील.
6. कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य, अवजारे तसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
7. विषयांकीत कामाच्या अर्ज छाननी शुल्क रु.1200/- अधिक 18% वस्तु व सेवा कर (GST) असे एकुण रु.1416/- (ना-परतावा) म.न.पा. च्या नागरी सुविधा केंद्र येथे भरण्यात यावे.
8. अर्ज छाननी शुल्क भरणा चलन दि.07/02/2024 ते दि.09/02/2024 रोजी सकाळी 11.00 ते सायं. 05.30 वाजेपर्यंत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता) कार्यालयामार्फत देण्यात येईल. सदर वेळेनंतर आलेल्या संस्थांना अर्ज शुल्क भरणा चलन देण्यात येणार नाही.
9. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.10/02/2024 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंतच असून त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
10. जर एखादी संस्था दिलेले काम करण्यास असमर्थ ठरली तर दुस-या संस्थेची नेमणूक सोडत पध्दतीने प्रतिक्षा यादीकरीता निवडण्यात आलेल्या संस्थांमधून मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांच्या मंजुरीने सोडत पध्दतीने करण्यात येईल व दंड म्हणून अशा असमर्थ संस्थेचे नाव काळया यादीत टाकण्याचे प्रस्ताविण्यात येईल.
11. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक करण्याचा तथा सदर कामास स्थगिती देण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण**